**महाराष्ट्र शासन**
**समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**३ चर्च पथ, पुणे-४११००१**
**दुरध्वनी ०२०-२६१२६३०७/२६१२६०५६०** **ई-मेल sakalyanpunenahas@gmail.com**
************************************************************************

**वाचा :-**

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.दवसु-२०१५/प्र.क्र.३४७/अजाक, दिनांक ९ मार्च, २०१८
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. सावियो-२०२०/प्र.क्र.३६/अजाक, दिनांक ३१ मार्च, २०२०

************************************************************************

क्र.सकआ/मावक/सावियो/तवा/लोप्रका/२०१९-२०/का-१२/ 906 दिनांक : ३१ मार्च,२०२०

## निधी वितरण आदेश क्रमांक ३ (सन २०१९-२०)

### ( योजनेचे नाव :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना )

उपोदघातातील संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयान्वये शासनाने नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीं / गावांमध्ये मा.लोकप्रतिनिधींनी सुचविल्यानुसार मुलभूत सोयी-सुविधांची कामे करण्यासाठी **"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना"** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून लागू केली आहे.

सदर योजनेसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये ५००.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत झाला असून त्यापैकी रु. ३००.०० कोटी इतका निधी संगणक वितरण प्रणालीवर उपलब्ध आहे.

उपोदघातातील संदर्भ क्रमांक २ मधील शासन निर्णयानुसार शासनाने रु. ९९९२.६० लक्ष इतक्या रकमेच्या १०१० कामांना प्रशासकीय मान्यता दिली असून या कामांकरीता सन २०१९-२० या वर्षात ३५ टक्के नुसार रु. ३४९७.४२ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे. शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने मी, भिमराव धों.खंडाते, आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मधील एकूण १०१० कामांसाठी रुपये ३४९७.४२ (अक्षरी रुपये चौतिस कोटी सत्यान्नव लाख बेचाळीस हजार फक्त) इतका निधी संगणक वितरण प्रणालीव्दारे प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग (संबंधीत) यांच्यामार्फत सहायक आयुक्त, समाजकल्याण (संबंधीत) यांना शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधीन राहून वितरीत करण्यास मान्यता प्रदान करीत आहे. जिल्हानिहाय मंजूर कामांची संख्या, त्यासाठी तत्वत: मंजूर रक्कम व वितरीत करावयाची रक्कम याबाबतचा तक्ता या सोबत जोडला आहे. त्यानुषंगाने सहायक आयुक्त, समाजकल्याण, संबंधित यांनी सदरची तरतूद कोषागारातून आहरीत करुन शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदर बाबींवर होणारा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षात खालील लेखाशिर्षाखाली प्राप्त तरतूदीतून भागविण्यात यावा:-

**लेखाशिर्ष** :-

मागणी क्रमांक-०३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,
इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण,
०१, अनुसुचित जातीचे कल्याण, ७८९, अनूसूचित जाती उपाययोजना,
(०४) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना,
(०४)(०१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना राबविणे,
राज्यस्तर, २७ लहान बांधकामे, ५०-इतर खर्च, २२२५-एफ-०८५

(भिमराव धों. खंडाते)
आयुक्त, समाजकल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत : माहितीस्तव सविनय सादर:-

१)मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२)मा.प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
३)मा. महालेखाकार, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.

प्रत : माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:-

१)मा. जिल्हाधिकारी, (सर्व)
२)अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, (सर्व)
३)कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग(सर्व)
४)उपायुक्त (लेखा/नियोजन), समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५)प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग (सर्व)
६)सहायक आयुक्त, समाजकल्याण (सर्व)
७)जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८)जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)

(भिमराव धों. खंडाते)
आयुक्त, समाजकल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना (लेखाशिर्ष २२२५-एफ०८५)
## शासन निर्णय क्र. सावियो-२०२०/प्र.क्र.३६/अजाक, दिनांक ३१ मार्च, २०२०
## सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर कामे व वितरी करावयाच्या निधीचा तपशिल

(रुपये लाखात)

| क्र. | जिल्हा | मंजूर कामांची संख्या | तत्वत: मंजूर रक्कम | वितरीत करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मुंबई शहर | ८ | १००.०० | ३५.०० |
| २ | मुंबई उपनगर | २० | ३००.०० | १०५.०० |
| ३ | ठाणे | ० | ०.०० | ०.०० |
| ४ | पालघर | ० | ०.०० | ०.०० |
| ५ | रायगड | ४० | २०६.०० | ७२.१० |
| ६ | रत्नागिरी | ० | ०.०० | ०.०० |
| ७ | सिंधूदूर्ग | ० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **६८** | **६०६.००** | **२१२.१०** |
| ८ | पुणे | ९५ | ७०८.०० | २४७.८० |
| ९ | सातारा | २० | १७८.९७ | ६२.६४ |
| १० | सांगली | ७६ | ५३७.५० | १८८.१३ |
| ११ | सोलापूर | ३ | १३.०० | ४.५५ |
| १२ | कोल्हापूर | ४४ | २४१५.०० | ८४५.२५ |
| | **एकूण** | **२३८** | **३८५२.४७** | **१३४८.३७** |
| १३ | नाशिक | ३२ | ४००.०० | १४०.०० |
| १४ | अहमदनगर | ० | ०.०० | ०.०० |
| १५ | जळगाव | ० | ०.०० | ०.०० |
| १६ | धुळे | ३ | २०.०० | ७.०० |
| १७ | नंदुरबार | ० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **३५** | **४२०.००** | **१४७.००** |
| १८ | औरंगाबाद | ९ | ७९.०० | २७.६५ |
| १९ | जालना | ३ | ९.०० | ३.१५ |
| २० | बीड | ४१७ | २८०६.१३ | ९८२.१५ |
| २१ | परभणी | ४५ | ४२५.०० | १४८.७५ |
| | **एकूण** | **४७४** | **३३१९.१३** | **११६१.७०** |
| २२ | लातूर | ४९ | ३९५.०० | १३८.२५ |
| २३ | उस्मानाबाद | २१ | १००.०० | ३५.०० |
| २४ | नांदेड | ५९ | ५२५.०० | १८३.७५ |
| २५ | हिंगोली | ० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **१२९** | **१०२०.००** | **३५७.००** |
| २६ | अमरावती | ० | ०.०० | ०.०० |
| २७ | यवतमाळ | ० | ०.०० | ०.०० |
| २८ | अकोला | ५ | २५.०० | ८.७५ |
| २९ | वाशिम | ० | ०.०० | ०.०० |
| ३० | बुलडाणा | ० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **५** | **२५.००** | **८.७५** |
| ३१ | नागपूर | १५ | ४५०.०० | १५७.५० |
| ३२ | वर्धा | ० | ०.०० | ०.०० |
| ३३ | भंडारा | १८ | २००.०० | ७०.०० |
| ३४ | गोंदिया | २८ | १००.०० | ३५.०० |
| ३५ | चंद्रपूर | ० | ०.०० | ०.०० |
| ३६ | गडचिरोली | ० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **६१** | **७५०.००** | **२६२.५०** |
| | **राज्य एकूण** | **१०१०** | **९९९२.६०** | **३४९७.४२** |

(अक्षरी रुपये चौतीस कोटी सत्यान्नव लाख बेचाळीस हजार फक्त)

आयुक्त, समाजकल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

सन २०१९-२० या वर्षासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत कामांना मंजुरी.

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**

शासन निर्णय,क्रमांक :सावियो-२०२०/प्र.क्र.३६/अजाक,

मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.

दिनांक : ३१ मार्च, २०२०.

**वाचा:**

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ०९ मार्च २०१८,
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक १६ ऑगस्ट,२०१९,
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ०६ सप्टेंबर,२०१९,
४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ३० डिसेंबर,२०१९,
५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ४ जानेवारी,२०२०,
६. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन पत्र, दिनांक १० जानेवारी,२०२०,
७. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक १८ मार्च,२०२०,
८. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, पत्र दिनांक २६ मार्च,२०२०,
९. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक २६ मार्च,२०२०.

**प्रस्तावना:**

राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती/गावांचा विकास करण्यासाठी व या घटकांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासनस्तरावरून मान्यता देण्यासाठी "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना" अशी राज्यस्तर योजना सन २०१८-१९ पासून राबविण्याचा निर्णय शासनाने उपरोक्त वाचा येथील शासन निर्णय, दिनांक ९ मार्च, २०१८ अन्वये घेतलेला आहे. त्यानुसार मा. लोकप्रतिनिधींनी (आमदार/खासदार) सुचविलेल्या नागरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमधील कामांना मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत" सन २०१९-२० या वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पीत तरतुदीतून या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" येथील नमूद कामांना मंजुरी देण्यात येऊन सदर कामांकरीता रुपये ९९९२.६० लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर कामांकरीता सन २०१९-२० या वर्षासाठी ३५ टक्केप्रमाणे रुपये ३४९७.४१ लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात येत आहे.

२. मा. लोकप्रतिनिधी ज्या कार्यान्वयीन यंत्रणेकडून सदर कामे करण्याबाबत सुचवतील त्या कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत सदर कामे करण्यात यावीत, उदा. सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामपंचायत किंवा शासनाचा अन्य विभाग.

३. कार्यान्वयीन यंत्रणेने तत्वतः मंजूर अंदाजीत किंमतीच्या कामाचे सविस्तर नकाशे/आराखडे अंदाजपत्रके तयार करुन ती संबंधीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावीत. जिल्हाधिकारी यांनी सदर कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करावी. कार्यान्वयीन यंत्रणेने शासनाच्या प्रचलित नियमानुसार कामाची निविदा प्रक्रिया राबवावी.

४. सदर कामे मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीच्या मर्यादेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त खर्चाच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिल्यास त्यासाठी कुठल्याही स्वरूपात अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही.

५. कामे सुरू करण्यापूर्वी सदर कामे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीमधीलच आहेत याची खातरजमा संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी करणे बंधनकारक आहे.

६. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेचा शासन निर्णय क्रमांक: दवसु-२०१५/प्र.क्र.३४७/अजाक, दिनांक ९ मार्च, २०१८ मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

७. सदर कामे सुरू करण्यापूर्वी संबंधित क्षेत्रात कुठल्याही सार्वत्रिक निवडणूक/पोट निवडणुकीसाठीची आचार संहिता अंमलात नाही, याबाबत त्या त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी खात्री करावी.

८. सदर खर्च हा सन २०१९-२० या वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पीत तरतुदीतून भागविण्यात येऊन पुढील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा :-

मागणी क्रमांक ०३

२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण

०१, अनुसूचित जातींचे कल्याण

७८९, अनुसूचित जाती उपाययोजना

(०४) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

(०४) (०१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना राबविणे (राज्यस्तर)

२७ लहान बांधकामे

२२२५ एफ ०८५

९. सदर निधी कोषागारातून आहरीत करुन संबंधीत यंत्रणांना वितरीत करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून तसेच संबंधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१०. सद्यस्थितीत कोरोना व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी देश व्यापी "लॉकडाऊन" जाहीर करण्यात आले असल्याने जिल्हास्तरावर या मंजूर कामांना प्रशासकीय मान्यता देण्यास विलंब होईल. ही अडचण विचारात घेऊन, मंजूर निधी व्यपगत होऊ नये यासाठी सन २०१९ - २०२० मध्ये सदर योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या सर्व कामांना प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून सन २०१९ - २०२० या आर्थिक वर्षात वर नमूद लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध असलेली तरतूद कोषागारातून आहरीत करण्यास संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण तथा या योजनेचे आहरण व संवितरण अधिकारी यांना परवानगी देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( दिनेश डिंगळे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधान मंडळ, मुंबई.
२. सर्व सन्माननीय सदस्य,विधानसभा/विधान परिषद,
३. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.मंत्री, महसूल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मत्री, ग्रामविकास याचे खाजगी सचिव, मत्रालय, मुबई,
८. मा.मंत्री,आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. मा.मंत्री,अल्पसंख्यांक यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०.मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
१२. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
१५. मा.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपुर,
१६. मा.महालेखापाल (लेखापरिक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपुर,
१७. सर्व जिल्हाधिकारी,
१८. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, सर्व,
१९. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सर्व,
२०. कोषागार अधिकारी, सर्व जिल्हे,
२१. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२. निवडनस्ती (अजाक).